# ‘दिव्य’ यशानंतरचे चित्र

**दिव्या देशमुखने निश्चितच भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. क्रिकेटपटूंना मिळणाऱ्या आर्थिक लाभाच्या तुलनेत अन्य प्रतिभाशाली खेळाडूंना क्रिकेटच्या तोडीचे फायदे मिळत नाही, हे वास्तव आहे. आज तिच्यामुळे देशात बुद्धिबळाचे वारे वाहू लागले आहेत.**

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**आपल्याकडे क्रिकेटव्यतिरिक्त इतर खेळांची चर्चा तात्पुरता रंगलेली दिसते. दिव्याच्या आगमनानंतर काही तासांनीच पुन्हा एकदा भारत-इंग्लंड पाचव्या कसोटीच्या निमित्ताने सर्वांचे लक्ष क्रिकेटकडेच वेधले गेले आहे. यामध्ये क्रिकेटला आणि या खेळाच्या प्रशासकांना दोष अजिबात देता येणार नाही, पण लोकांनीही आपले क्रीडाप्रेम तात्पुरता न दाखविता, ते कायमस्वरूपी आणि प्रामाणिकपणे दाखवावे हीच इच्छा.**

**विदर्भ कन्या** १९ वर्षीय ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिने बुद्धिबळ विश्वचषक पटकावून सर्व भारतीयांची मान उंचावली आहे. राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून सर्वांनीच दिव्याचे भरभरून अभिनंदन केले आहेच. जोडीला राज्य शासनातर्फे दिव्याचा यथोचित गौरव करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्याची एक झलक नागपूर विमानतळावर जेव्हा दिव्याचे आगमन झाले, तेव्हा बघायला मिळाली. यापुढे दिव्याचे सत्कार समारंभ भरपूर होणार, यात काहीच शंका नाही. परंतु, एक प्रश्न यानिमित्ताने क्रीडातज्ज्ञांना पडला आहे तो म्हणजे, दिव्यासारख्या बुद्धिबळपटूला क्रिकेटपटूंसारखा आर्थिक लाभ होईल का?

राज्य शासनाने दिव्याचा ३ कोटी रूपये देऊन सन्मान केला. हे कौतुकास्पदच आहे. पण, ही रक्कम तिला दीर्घ कारकिर्दीसाठी पुरेशी ठरणारी आहे का, याचाही विचार व्हायला पाहिजे. अनेक वर्षांच्या मेहनतीतून दिव्याने हे यश मिळवले आहे. स्वाभाविकच विचार येतो की, भविष्यात अशी कामगिरी करायची झाल्यास दिव्याला भरघोस आर्थिक पाठबळाची आवश्यकता भासणार आहे. त्याची तरतूद कोण आणि कशी करणार?

याविषयी अर्जुन पुरस्कार विजेते ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे म्हणाले की, ‘दिव्याला भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षणाची गरज भासणार आहे. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षक, वातावरणासोबतच सुरक्षित आर्थिक भविष्याची हमी मिळणे गरजेचे आहे.’



## क्रिकेटवर टीक करणे अर्थहीन

क्रिकेटवेड्या भारतामध्ये जेव्हा दिव्यासारखे खेळाडू अशीच चमकदार कामगिरी करतात, तेव्हा त्यांच्या यशाला एक वेगळीच झळाळी मिळाली असते. कारण, क्रिकेटच्या लोकप्रियतेमुळे अन्य खेळ झाकोळलेले असतात. अर्थात यामध्ये क्रिकेट खेळावर टीका करण्यासारखे काही नाही.

**परंतु, क्रिकेट हा निव्वळ खेळ राहिलेला नसून त्याचे रूपांतर महाप्रचंड व्यवसायात झालेले आहे, हे मान्य करण्यातही काही गैर नाही. क्रिकेट खेळाला मिळालेल्या या प्रचंड लोकप्रियतेमागे आधुनिक व्यवस्थापकीय कार्यशैली जबाबदार आहे.**

तसेच, काहीअंशी ऐतिहासिक वारसाही कारणीभूत आहे. वसाहतवादी इंग्रजांपासून भाषेपासून जशा अनेक गोष्टी आपण स्वीकारल्या, तशाच प्रकारे क्रिकेटलाही भारतीयांनी आत्मसात केले. त्यातूनच पुढे सध्याचे क्रिकेटचे आधुनिक स्वरूप आपण बघत आहोत.

## देशभरात इतर खेळांची चर्चा तात्पुरत्या काळादरम्यान रंगलेली दिसते

१ मुळातंच, भारतीयांना असलेल्या क्रिकेटच्या आकर्षणाला राजकीय पाठबळ आणि माध्यमांची जोड मिळाली, बरोबरीने अव्वल व्यावसायिक कौशल्य आणि देशप्रेमाचा तडका देऊन संघटना चालकांनी क्रिकेटचा व्यवसाय वृद्धिंगत केला. क्रीडा संघटनांनी आखलेला हा मार्ग किती योग्य, अयोग्य यावर चर्चा होऊ शकते. परंतु, त्यांच्या व्यावसायिक शिस्तीचे मात्र अन्य संघटनांनी अनुकरण करावे अशीच आहे. त्याचप्रमाणे, या खेळाला सर्वांत मोठा खांब आहे तो या खेळाचा चाहता वर्ग.

२ दिव्याने निश्चितच भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. क्रिकेटपटूंना मिळणाऱ्या आर्थिक लाभाच्या तुलनेत अन्य प्रतिभाशाली खेळाडूंना क्रिकेटच्या तोडीचे फायदे मिळत नाही, हे वास्तव आहे. आज तिच्यामुळे देशात बुद्धिबळाचे वारे वाहू लागले आहेत. पण, प्रश्न असा आहे की हे वारे कधीपर्यंत वाहत राहणार? कारण, आपल्याकडे क्रिकेटव्यतिरिक्त इतर खेळांची चर्चा तात्पुरता रंगलेली दिसते. ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा, राष्ट्रकुल अशा स्पर्धा सुरू झाल्यानंतर त्या त्या काळापुरता इतर खेळांची चर्चा रंगते. त्याव्यतिरिक्त दिव्यासारख्या खेळाडूंनी जागतिक यश मिळवल्यानंतर त्या त्या खेळाकडे लोकांचे लक्ष जाते.

३ आताही दिव्याच्या आगमनानंतर काही तासांनीच पुन्हा एकदा भारत-इंग्लंड पाचव्या कसोटीच्या निमित्ताने सर्वांचे लक्ष क्रिकेटकडेच वेधले गेले आहे. यामध्ये क्रिकेटला दोष अजिबात देता येणार नाही. पण, लोकांनीही आपले क्रीडाप्रेम तात्पुरता न दाखविता, ते कायमस्वरूपी आणि प्रामाणिकपणे दाखवावे हीच इच्छा.